# ज्ञानरचनावाद: संकल्पना व पध्दती

**ज्ञानरचनावाद हा तीन पातळीवर आपल्याला भेटतो**

१. तत्त्वज्ञान

२. शिक्षणविषयक विचारसरणी

३. शिक्षणपध्द्ती

ज्ञानरचनावाद हे एक 'ज्ञाननिर्मितीशास्त्रा'तील(Epistemology) एक तत्त्व आहे; तत्त्वज्ञान आहे.

- ज्ञान हा साठा नाही, तर माहिती हा साठा आहे.
- माहितीवर काही प्रक्रिया घडून त्याचे मेंदूच्या पातळीवर ज्ञानात रूपांतर होते.
- ही जी प्रक्रिया असते ती शिकण्याची प्रक्रिया असते.
- म्हणजे माहितीवर शिकण्याची प्रक्रिया होऊन, अंतिमत: जे आपण शिकतो' त्याला ज्ञान म्हणतात.
- याचा अर्थ असा की ज्ञान हे 'स्वनिर्मित' असते.
- प्रत्येकाचे शिकणे हे व्यक्तिगत असते, इतरांपासून वेगळे असते, स्वतंत्र असते. म्हणजेच स्वतच्या ज्ञानाची रचना स्वत: करतो.
- स्वत:चे ज्ञान स्वत: रचणे हे ज्ञानरचनावादाचे तत्त्व आहे. व्यवहारात 'ज्ञान' हे 'समज', 'शहाणपणा' या शब्दांनी संबोधता येते.

**शिक्षणव्यवहारात ज्ञानरचनावाद हा ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया पायाभूत मानतो.**

- माणसाला निसर्गत:च आकलनाची (knowing) क्षमता प्राप्त झाली आहे.
- ही क्षमता माणसाला जनुकांतून (Genes ) मिळते. • माहिती (Information) ही हजारो वर्षे, संस्कृतीच्या विकासात साठत गेली आहे.
- ही माहिती माणसाला मनुकांतून (Memes) मिळते. (मनुके ही जनुकांप्रमाणेच हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून निर्माण होतात; आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोचविली जातात. मनुके हा शारीरिक जनुकांचा सांस्कृतिक सखा आहे! शिक्षणव्यवहारात ज्ञानरचनावाद हा ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया पायाभूत मानतो.
- म्हणजे जनुके ही नैसर्गिक माहिती देतात तर मनुके ही सांस्कृतिक माहिती देतात.
- ज्ञाननिर्मितीसाठी काहीतरी प्रक्रिया घडून ह्या दोन्हींचा संयोग व्हावा लागतो.
- जनुकांतील माहिती (आकलनक्षमता) ही जशी मेंदूतील पेशींमध्ये साठविलेली असते तशीच मनुकांमधील माहितीसुध्दा पेशींमध्ये साठविलेली असते.
- त्यामुळे ह्या दोन्हींच्या संयोगाची प्रक्रिया ही मेंदूमधील किंवा मानसपातळीवरील प्रक्रिया असते. शिक्षणव्यवहारात ज्ञानरचनावाद हा ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया पायाभूत मानतो.

- ही शिकण्याची प्रक्रिया असते.

आकलनक्षमता ==> शिकण्याची प्रक्रिया <== माहिती स्त्रोत

⇓

- ज्ञाननिर्मिती

- थोडक्यात, ज्ञान (knowledge) हे शिकण्याच्या प्रक्रियेचे मानसस्तरावरील फलित असते.
- वेगळ्या शब्दांत, माहितीवर शिकण्याची प्रक्रिया होऊन, जे आपण शिकतो त्याला ज्ञान म्हणतात. ही व्यक्तिगत प्रक्रिया असते. हे ज्ञानरचनावादाचे पायाभूत सूत्र आहे. ज्ञानरचनावादाची विचारसरणी
- वर्तनवादी विचारसरणीत - 'माहितीकडून माहितीकडे' असा प्रवास होता. बाह्य माहिती शिक्षकाकरवी विद्यार्थ्यांकडे पोचवणे ही शिक्षणक्रिया शाळातून घडते. किती माहिती नीटपणे पोचली यावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होते. माहितीचा साठा मागील पिढीकडून पुढील पिढीकडे सुपूर्त करायचा तो व्यवहार होता.
- रचनावादी विचारसरणीत - 'माहितीकडून ज्ञानाकडे' - ज्ञाननिर्मितीकडे असा प्रवास आहे. येथे मिळालेल्या माहितीचे रूपांतर आपल्या स्वतःच्या ज्ञाननिर्मितीत करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी लागते.
- अशी संधी देणारी जी व्यवस्था, तिला शाळा म्हणायचे. 'संधी देते ती शाळा' अशी शाळेची नव्याने व्याख्या करायची. मुलांना आपणहून शिकण्याची - स्वयंशिक्षणाची संधी देणारी शिक्षणपध्दती म्हणजे ज्ञानरचनावादी शिक्षणपध्दती.

**ज्ञानरचनावाद : एक शिक्षणपध्दती**

ज्ञानरचनावादी शिक्षणपध्दतीची महत्त्वाची सूत्रे अशी :

- व्यक्तिगत शिक्षण
- अनुभवांधारित शिक्षण
- कृतिशील मूर्त अनुभवांकडून वैचारिक अमूर्त अनुभवांकडे
- वातावरण निर्मिती
- योग्य आव्हाने
- भावनिक स्थिरता

❖